# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)

क्र. सआएच/ पूर्व/४८५/एस.आर./स.अ./परि.दि. ०४.०७.२०२४

## स्वारस्य अभिव्यक्ती

एच/पूर्व विभागातील, आराम सोसायटी ते सेंट ॲंथनी रस्त्यास जोडणारा विकास नियोजन रस्त्याचे टोटल स्टेशन सर्वे करण्याबाबत या कामाकरीता म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. 320/- + 18% टक्के GST कर, इसारा अनामत रक्कम रू. 6000/- भरून मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. 05.07.2024 रोजी दुपारी 04 वाजेपर्यंत आहे. अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदारांचे मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 05.07.2024 रोजी दुपारी 04:00 नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक 05.07.2024 रोजी दुपारी 05:00 नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत सर्वे कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत सर्वे कंत्राटदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त ' एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

सही/-

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**